# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. ३१/१०/२०१८

## दौंड क्षेत्रीय कार्यालय येथील वनपालास दहा हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांनी शस्त्र परवाना मिळणेसाठी अर्ज केला आहे. सदरचा शस्त्र परवाना मिळणेसाठी वनविभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र तक्रारदार यांना देण्यसाठी दौंड येथील वनविभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे पाठपुरावा करीत होते. त्यावेळी तक्रारदार यांचेकडे दौड येथील वनपाल समाधान पाटील यांनी दहा हजार रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची आज दिनांक ३१/१०/२०१८ रोजी पडताळणी केली असता, तक्रारदार यांना शस्त्र परवाना मिळणेकरीता आवश्यक असणारा वनविभागाचा ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी वनविभागाच्या दौंड येथील क्षेत्रीय कार्यालयातील वनपाल समाधान पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे दहा हजार रूपयांची लाचेची मागणी केली.

त्यावरुन आज दिनांक ३१/१०/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक समाधान मुरलीधर पाटील, वय- ३२, वनपाल, वनक्षेत्रीय कार्यालय दौंड रा. ३, वास्तु अपार्टमेंट शिवाजीनगर दौंड पुणे कार्यालयामध्ये येथे स्विकारल्यावर त्यास रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे